आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१९ एप्रिल २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महिला आरक्षणासाठीचं घटनादुरूस्ती विधेयक संसदेत मंजूर न झाल्याबद्दल प्रधानमंत्र्यांकडून खंत व्यक्त; काँग्रेस विभाजनाचं बीज पेरत असल्याचा आरोप

- काँग्रेसचा महिला आरक्षणाला पाठिंबा असल्याचं मल्लिकार्जून खरगे यांच्याकडून स्पष्ट; प्रधानमंत्र्यांनी शासकीय यंत्रणेचा गैरवापर केल्याचा खरगे यांचा आरोप

- देशभरात अक्षय्य तृतीयेचा उत्साह

**आणि**

- भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांना मुदतवाढ

**<><><><><>**

महिला आरक्षणासाठीचं घटनादुरूस्ती विधेयक संसदेत मंजूर न झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी खंत व्यक्त केली आहे. त्यांनी काल देशवासियांना दूरस्थ पद्धतीने संबोधित केलं. सरकारने प्रयत्न करूनही नारी शक्ती वंदन अधिनियमात दुरूस्ती होऊ शकली नाही याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. महिला आरक्षणाच्या नावाखाली सरकार लोकसभा मतदारसंघाची पुनर्रचना करू पाहत असल्याचा विरोधकांचा आरोप फेटाळून लावत प्रधानमंत्र्यांनी विरोधकांच्या हेतूवर शंका उपस्थित केली.

- **- होल्ड बाईट मोदी - -**

**<><><><><>**

गेल्या बारा वर्षांत काहीही ठोस करू न शकलेले प्रधानमंत्री नैराश्यग्रस्त झाले असून कालच्या त्यांच्या भाषणात त्यांनी केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप केल्याची टीका काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी समाजमाध्यमावर केली आहे. राज्यांच्या विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना प्रधानमंत्र्यांनी शासकीय यंत्रणांचा गैरवापर केला, ही लोकशाही आणि राज्यघटनेची विटंबना आहे, असं खरगे म्हणाले. काँग्रेसने महिला

आरक्षणाला नेहमी पाठिंबा दिला आहे, २०२३ ला महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा दिला, याच विधेयकाची अधिसूचना १६ एप्रिलला सरकारने काढली असं खरगे म्हणाले.

<><><><><>

पश्चिम बंगाल आणि तमिळनाडू विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्व पक्षाचे प्रमुख नेते आपापल्या उमेदवारांचा प्रचार जोरदारपणे करत आहेत. तसंच सभा, रॅली, बैठका याद्वारे मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत आहेत.

भाजपाचे नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज पश्चिम बंगालमध्ये बांकुरा जिल्ह्यात बिष्णुपूर इथं एका प्रचार सभेला संबोधित केलं. महिला आरक्षण विधेयक रोखण्यासाठी तृणमूल काँग्रेसनं काँग्रेससोबत संगनमत केलं, जनता त्यांना याची शिक्षा देईल अशी टीका त्यांनी केली. भाजपा महिलांची सुरक्षा आणि संरक्षणासाठी वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी देखील आज विविध प्रचारसभा घेणार आहेत. आज दुपारी त्या तारकेश्वर इथं प्रचारसभेला संबोधित करतील. त्यानंतर त्या कालना आणि मोंतेश्वर इथंही आपल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा गेतील. संध्याकाळी त्या वर्धमान दक्षिण इथं पदयात्रेत सहभागी होणार आहेत.

भाजपाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज तमिळनाडूत इरोडमधल्या शिवगिरी इथं राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेतली.

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी तामीळनाडूच्या उत्तरेकडेच्या जिल्ह्यांमध्ये आपल्या उमेदवारांचा प्रचार केला. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनीही कोईम्बतूर, तिरुपूर आणि निलगिरी भागात धर्मनिरपेक्ष पुरोगामी आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचार फेरीत सहभाग घेतला. तर कणिमोळी यांनी वृद्धाचलम इथं प्रचार केला.

<><><><><>

उपराष्ट्रपति सी. पी. राधाकृष्णन श्रीलंकेच्या दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी आज कोलंबो इथं पोहोचले. आपल्या भेटीदरम्यान ते श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके, प्रधानमंत्री हरिनी अमरसूर्या, आणि इतर नेत्यांशी चर्चा करतील. श्रीलंकेतल्या भारतीय समुदायाशी देखील ते संवाद साधतील. त्यांच्या या दौऱ्यामुळे दोन्ही देशांमधले संबंध आणखी दृढ होतील अशी अपेक्षा आहे.

<><><><><>

महाराष्ट्रासह देशभरात आज अक्षय्य तृतीयेचा सण उत्साहात साजरा होत आहे. साडेतीन मुहुर्तांपैकी एक समजला जाणारा हा सण, कधीही नाश न पावणारं सुख आणि समृद्धीचं प्रतीक समजला जातो. अक्षय्य तृतीयेच्या निमित्तानं महाराष्ट्रात मुंबईसह राज्यभरात सणाचा उत्साह आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह, मराठवाड्यातल्या सर्व प्रमुख शहरांच्या बाजारपेठांमध्ये आज नागरिकांचा खरेदीचा उत्साह दिसून येत आहे. बाजारपेठ आंबे, डांगर आणि मातीच्या घागरींनी सजली आहे. आजच्या मुहूर्तावर राज्यात मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे देखील होतात. हे लक्षात घेऊन, राज्य शासनानं बाल विवाह रोखण्यासाठी कडक उपाययोजना केल्या आहेत. यंदा, सोन्याचे दर विक्रमी पातळीवर असले, तरी सोनं खरेदीचा उत्साह मात्र कायम आहे.

आज परशुराम आणि  महात्मा बसवेश्वर यांची जयंती देखील साजरी होत आहे. अक्षय्य तृतीया तसंच परशुराम आणि बसवेश्वर जयंतीनिमित्त  राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये, उत्तरकाशी जिल्ह्यातल्या गंगोत्री आणि यमुनोत्री या तीर्थक्षेत्रांचे दरवाजे आज अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर भाविकांसाठी खुले करण्यात आले. याबरोबर उत्तराखंडमधल्या चार धाम यात्रेला आज औपचारिक सुरुवात झाली.

<><><><><>

महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यातल्या एका आयटी कंपनीतल्या धर्मांतर प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास करावा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी  दिले आहेत. राज्यातल्या कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी काल झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले. या प्रकरणी दोषी व्यक्तींना कठोर शासन व्हावं, यासाठी तपासामध्ये कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची खात्री करावी, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

या बैठकीत मुख्यमंत्री फडनवीस यांनी मुंबईत गोरेगाव इथल्या अमली पदार्थ प्रकरणी कारवाईला गती देण्याचे निर्देशही दिले. ११ एप्रिल रोजी गोरेगाव इथल्या 'नेस्को' प्रदर्शन

केंद्रातआयोजित एका कार्यक्रमात अमली पदार्थांच्या अती- सेवनामुळे एमबीए च्या दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी हातखंबा इथं लोखंडी सळ्यांची वाहतूक करणारा एक ट्रक कोसळून विहरीत गेला. या अपघातात ट्रकचा चालक आणि क्लिनर गंभीर जखमी झाले आहेत. अपघात होण्याआधी या ट्रकनं तीन ते चार वाहनांना धडक दिली आणि त्यानंतर तो रस्तावरून तीस ते चाळीस फूट खाली कोसळला आणि विहरीत गेल्याची माहिती स्थानिकांनी दिली. जखमी क्लिनरला तातडीनं  तातडीनं उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं असून, चालक ट्रकमध्येच अडकला होता, त्याच्या सुटकेसाठी अग्निशमन दलाचे जवान शर्थीचे प्रयत्न करत होते असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

<><><><><>

हवामानाचा अभ्यास करून त्यावर देखरेख ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेला भारताचा G20 उपग्रह पुढल्या वर्षात प्रक्षेपित केला जाईल, अशी शक्यता असल्याचं इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी म्हटलं आहे.  ते काल हैदराबाद मध्ये आयोजित कार्यक्रमात संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, इस्रो, आणि 'एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया'च्या शास्त्रज्ञांना संबोधित करत होते.  केवळ एकाच रॉकेटचा वापर करून १०० पेक्षा जास्त उपग्रहांचं प्रक्षेपण करणारा भारत हा पहिला देश असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. G20 देशांसाठी G20 उपग्रह प्रक्षेपित करण्यात भारत आघाडीची भूमिका बजावत असून, हा उपग्रह, वायू प्रदुषणाचा देखील अभ्यास करेल असं ते म्हणाले.

चंद्रावर मानव पाठवण्याच्या दिशेने इस्रोचे प्रयत्न सुरु असून, २०४० पर्यंत हे  यश साध्य झालं, तर भारत अंतराळ-कार्यक्रम राबवणाऱ्या अन्य देशांच्या बरोबरीचं स्थान मिळवेल, असं  व्ही. नारायणन म्हणाले.

<><><><><>

आज जागतिक यकृत दिवस आहे. या निमित्तानं निरोगी यकृत आणि निरोगी भविष्यासाठी नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनात उत्तम पर्याय निवडावेत, असं आवाहन केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी केलं आहे. आपलं शरीर निरोगी आणि

कार्यरत ठेवण्यात यकृताची भूमिका महत्वाची असून, पौष्टिक आहार, योग्य प्रमाणात पाण्याचं सेवन आणि शारीरिक कार्यक्षमता यासाठी पूरक ठरेल, असं त्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात पनवेल तालुक्यात पाडेघर परिसरातल्या एका कार्गो कंपनीच्या रासायनिक गोदामात काल आग लागली. यावेळी झालेल्या स्फोटांमुळे परिसरात घबराट पसरली. आगीत कोणतीही हानी झाल्याचं वृत्त नाही.

**<><><><><>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांचा कार्यकाळ एका वर्षानं वाढवला आहे. २०२७ च्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीनं हा निर्णय घेतला असल्याचं नियामक मंडळानं म्हटलं आहे. जुलै २०२३ मध्ये आगरकर यांची वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांच्या आत्तापर्यंतच्या कार्यकाळात निवडलेल्या भारतीय संघांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या वतीनं आयोजित चार स्पर्धांच्या अंतिम फेरीत धडक मारली, आणि त्यापैकी दोन टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक तसंच, एका आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं विजेतेपदही पटकावलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज कोलकत्त्याच्या ईडन गार्डनर स्टेडियमवर कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना दुपारी साडेतीन वाजता सुरु होईल. तर संध्याकाळी साडेसात वाजता पंजाब किंग्ज आणि लखनऊ सूपर जाएंट्स यांच्यात सामना होणार आहे. हा सामना चंदीगढच्या महाराजा यादविंद्र सिंग मैदानावर खेळला जाईल.

दरम्यान, स्पर्धेत काल संध्याकाळी झालेल्या सामन्यात सनरायझर्स हैद्राबादनं चेन्नई सूपर किंग्जवर १० धावांनी विजय मिळवला.

**//<><><><><>//**